# लक्ष्य करीयर अकॅडमी

मो. 7887878001/ 7887878002


संच क्र. **B**

**2023**

**Test No : 12**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

**BOOKLET NO : 238342**

**प्रश्नपुस्तिका**

**C19**

**एकूण प्रश्न : १००**

वेळ : २ तास

**(Indian History full length)**

**एकूण गुण : २००**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत.उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी.तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपल्या परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑ ... ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1,2,3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमुद करावा.अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करुन दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.**ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे,पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**

**(ब) आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे.त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे.त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास,उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही.नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्याकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच " उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एका प्रश्नाचे** 25% **किंवा** 1/4 **गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे.ही वेळ संपेपर्यत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती,किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे,तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या " परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

# परीक्षार्थींचे स्व-आकलन

| अ.क्र | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

* मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकांवरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

7887878001
7887878002
लक्ष्य
करीयर अकॅडमी

**Q.1)** राजाराम मोहन रॉय यांनी खालीलपैकी कोणत्या गोष्टीसाठी विशेष प्रयत्न केले?

**पर्यायी उत्तरे :**

1) शिक्षणाचा प्रसार 2) स्त्री-स्वातंत्र्य 3) स्त्री-पुरुष समता 4) वरील सर्व

---

**Q.2)** खालीलपैकी...........यांनी मुस्लिम मुलींसाठी पटना व कलकत्ता येथे शाळा सुरु केल्या.

**पर्यायी उत्तरे :**

1) राजकुमारी अमृत कौर 2) बेगम रखिया सकवात हुसेन
3) मुमताज आली 4) सय्यद अहमद खान

---

**Q.3)**

अ) तो कलकत्ता सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होता.
ब) तो एक बहुभाषिक (ङळपर्सीळीींळ) सुध्दा होता.
क) त्याने भारतात संस्कृत भाषा शिकवण्यास सुरुवात केली.
ड) त्याला भारतीय व पश्चिमात्य संस्कृतीचा अभिमान व आदर होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) वारेन हेस्टिंग 2) एलिजाह एम्पे. 3) जोनाथन डंकन. 4) विल्यम जोन्स

---

**Q.4)** खालीलपैकी प्रार्थना समाजाची समाज सुधारणा विषयक तत्वे कोणती आहेत?

अ) जाती बंधे उठवणे. ब) बालविवाह बंदी आणने.
क) स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार करणे. ड) विधवा पुनर्विवाह प्रोत्साहित करणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब 2) ब, क, ड 3) अ, ब, ड 4) सर्व बरोबर

---

**Q.5)** योग्य जोडया जुळवा.

अ) Self Respect चळवळ a) घासीदास
ब) सतनामी चळवळ b) महात्मा फुले
क) स्त्री शिक्षण चळवळ c) सय्यद अहमद खान
ड) अलीगढ चळवळ d) पेरियार रामास्वामी

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | d | c | b | a |
| 2) | d | a | b | c |
| 3) | c | a | b | d |
| 4) | c | a | d | b |

**Q.6)** 1823 मध्ये सती प्रथा बंद करण्यासाठी ब्रिटीश पार्लमेंटला सादर केलेल्या अर्जावर खालीलपैकी कोणाच्या सह्या होत्या?

अ) राजा राम मोहन राय
ब) अय्यर
क) जगन्नाथ शंकर शेठ
ड) हेन्री विव्हिअन डिरोझिओ

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व क    2) अ, ब, क    3) फक्त अ    4) वरील सर्व

---

**Q.7)** " स्त्री शिक्षणाचे आद्य जनक " म्हणून ब्रिटीश सरकारने खालीलपैकी कोणाचा गौरव केला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) जगन्नाथ शंकरशेठ
2) महात्मा ज्योतिबा फुले
3) राजा राम मोहन रॉय
4) लेडी बेथ्यून

---

**Q.8)** खालील विधानांचा संदर्भ घेऊन संबंधित व्यक्ती ओळखा ?

अ) " प्रजावृध्दीचे दुष्परिणाम " हा त्यांचा अग्रलेख प्रसिध्द आहे.

ब) " रावसाहेब, मग सुधारकांचे ढोंग करु नका...." असे महात्मा फुले यांनी त्यांना म्हटले होते.

क) त्यांचा एम.ए. च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका सर अलेक्झांडर ग्रँड यांनी एडिंबरो विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी पाठविल्या.

ड) ते स्वत: कीर्तनकार होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) न्यायमूर्ती रानडे
2) वासुदेव चाफेकर
3) दादोबा पांडुरंग तरखडकर
4) लोकहितवादी

---

**Q.9)** खालील संस्थांचा स्थापनेनुसार योग्य कलानुक्रम असणारा पर्याय ओळखा.

अ) निष्काम कर्म मठ.
ब) महाराष्ट्र ग्राम शिक्षण प्रसारक मंडळ.
क) समता संघ
ड) महिला विद्यालय(पुणे)

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क, ड
2) ड, ब, अ, क
3) ड, अ, ब, क
4) ड, क, अ, ब

---

**Q.10)** देवदासी प्रथा बंदी करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले?

**पर्यायी उत्तरे :**

1) शिवराम जनाबा कांबळे
2) विठ्ठल रामजी शिंदे
3) राजर्षी शाहू महाराज
4) अ व ब

**Q.11)** योग्य जोडया जुळवा. (सत्यशोधक समाज : 1911)

| | |
|---|---|
| अ) अध्यक्ष | a) भास्करराव जाधव |
| ब) उपाध्यक्ष | b) अण्णासाहेब लठ्ठे |
| क) कार्यवाह | c) हरिभाऊ चव्हाण |
| ड) सर्वाधिकारी | d) म. ग. डोंगरे |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | b | c | a | d |
| 3) | d | a | c | b |
| 4) | a | b | d | c |

---

**Q.12)** काय आता करु धरुनिया भीड । निशंक हे तोंड वाजविले ।।
नवे जागी कोण मुकियाचा जाणा । सार्थक लाजून हित नव्हे ।।

**पर्यायी उत्तरे :**

1) साधना 2) मूकनायक 3) देशव्यवहार 4) इशारा

---

**Q.13)** " डोंगराची मैना " हा मराठी चित्रपट अण्णाभाऊ साठे यांच्या कोणत्या कादंबरीवर आधारित आहे?

**पर्यायी उत्तरे :**

1) फकीरा 2) वारणेचा वाघ 3) माकडीचा माळ 4) आवडी

---

**Q.14)** तुकाराम तात्या पडवळ यांच्या विषयी काय खरे नाही?

**पर्यायी उत्तरे :**

1) ते थिओसॉफिकल परिषदेशी संबंधित होते.
2) त्यांनी " जातीभेद विवेकसागर " हा ग्रंथ लिहिला.
3) त्यांनी बेहरामजी मलबारी यांचेबरोबर मुंबईत हेमिओपॅथीचा दवाखाना कढला होता.
4) त्यांनी ' आर्यभूषण छापखाना ' काढून संस्कृत ग्रंथ व तुकारामांचे अभंग प्रकाशित केले.

---

**Q.15)** रत्नागिरी जिल्हयात गौरी-गणपतीच्या वेळी पुरुषांनी स्त्री वेश धारण करुन टिचक्या वाजवत केलेली नृत्य म्हणजेच......

**पर्यायी उत्तरे :**

1) गोफ 2) धिम्रा 3) टिचकी 4) भोंडला

---

**Q.16)** खालील विधानांचा विचार करुन योग्य असणारा पर्याय ओळखा ?

अ) ॲनी बेझंट या प्रसिध्द थिओफिस्ट, समाजवादी कार्यकर्त्या लेखिका व वक्त्या होत्या.

ब) १८७५ मध्ये कुटुंब नियेजनाचा पुरस्कार करणारा " The fruits of philosophy " हा प्रबंध चार्ल्स ब्रेडला व एनी बेझंट यांच्याबरोबर लिहिला होता.

क) ॲनी बेझंट यांनी बनारस येथे सेंट्रल हिंदू महाविद्यालयाची ङ्क स्थापना केली होती.

ड) ॲनी बेझंट यांचे जे. कृष्णमूर्ती हे मानसपूत्र होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ड बरोबर    2) अ, ब, क बरोबर    3) फक्त ड    4) सर्व बरोबर

---

**Q.17)** .......यांनी दशावतारी खेळ दाखविणारा फड स्थापन केला होता; या माध्यमातून महाराष्ट्रभर दशावतारी नाटकांचे प्रयोग केले.

**पर्यायी उत्तरे :**

1) विष्णुदास भावे    2) श्यामजी नाईक काळे
3) सचित शंकर    4) महादेव शास्त्री कोल्हटकर

---

**Q.18)** योग्य जोडया जुळवा ?

अ) दादासाहेब फाळके    a) जैत रे जैत
ब) व्ही. शांताराम    b) मराठा तितुका मिळवावा
क) भालजी पेंढारकर    c) कुंकू
ड) जब्बार पटेल    d) राजा हरिश्चंद्र

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | d | c | a | b |
| 3) | d | c | b | a |
| 4) | a | b | d | c |

---

**Q.19)** योग्य विधान/विधाने ओळखा.

अ) लेझीम हा वीररसप्रधान नृत्य आहे.

ब) हे मुख्यत: पश्चिम महाराष्ट्राच्या भागात खेळले जाते.

क) यादवांच्या काळापासून सांघिक प्रकारे या खेळाची सुरुवात झाल्याचे मानले जाते.

ड) लेझीम खेळास १९८२ च्या आशियाई खेळांपासून शासनाने लोकनृत्याचा दर्जा दिला.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ड    2) अ, ब, ड    3) अ, क, ड    4) वरील सर्व

**Q.20)** लोणार सरोवरासंबंधी खालील विधानांचा विचार करा?

अ) लोणार सरोवर हे महाराष्ट्राच्या अकोला जिल्हयात आहे.

ब) लोणार सरोवराची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकातून झाली.

क) पद्म व स्कंद पुरानांमध्ये लोणार तलावाचा उल्लेख आढळतो.

ड) लोणार सरोवराचा समावेश रामसार यादीत करण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त ड अयोग्य
2) अ, ब, क योग्य
3) अ व ब अयोग्य
4) अ व ड योग्य

---

**Q.21)** " अकाली चळवळ " ही खालीलपैकी कोणत्या राष्ट्रीय चळवळी दरम्यान सुरु झाली होती?

**पर्यायी उत्तरे :**

1) स्वदेशी चळवळ
2) असहकार चळवळ
3) सविनय कायदेभंग चळवळ
4) चले जाव चळवळ

---

**Q.22)** " माझा प्रवास " हे 1857 च्या काळातील घटनांचे वर्णन करणारे पुस्तक..........यांनी लिहिले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) गोडसे भटजी
2) न. र. फाटक
3) आर. सी. मुझूमदार
4) वि.का. राजवाडे

---

**Q.23)** खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा.

**पर्यायी उत्तरे :**

| **संस्थापक** | **संस्था** |
|---|---|
| 1) जेरेमी बेंथम | :- युनिलॅटरल स्कूल |
| 2) विल्यम जोन्स | :- हिंदू बालिका विद्यालय |
| 3) जोनाथन डंकन | :- संस्कृत कॉलेज |
| 4) विल्यम कॅरी | :- सेरामपूर कॉलेज |

---

**Q.24)** " Safety wolve Theory " म्हणजेच

**पर्यायी उत्तरे :**

1) या सिध्दांतानुसार काँग्रेसची स्थापना ब्रिटिश सामाज्याला आव्हान म्हणून झाली.
2) या सिध्दांतानुसार काँग्रेसची स्थापना मध्यमवर्गीयांचे प्रतिनिधत्व करणारी संस्था आहे.
3) या सिध्दांतानुसार काँग्रेसची स्थापना ब्रिटिश साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी झालेली आहे.
4) या सिध्दांतानुसार काँग्रेस म्हणजे वकील व पत्रकार यांचे संघटन करणारी संघटना आहे.

---

**Q.25)** गांधीजींचे अखिल भारतीय स्तरावरील सर्वांत पहिले आंदोलन म्हणजे......होय.

**पर्यायी उत्तरे :**

1) स्वदेशी आंदोलन
2) पोल टॅक्स विरोधातील आंदोलन
3) रौलट कायद्या विरोधातील आंदोलन
4) असहकार आंदोलन

---

**Q.26)**

अ) स्वामी सहजानंद सरस्वती
ब) एन. जी. रंगा
क) अजित सिंह
ड) बाबा रामचंद्र

खालीलपैकी कोणत्या चळवळीची वरीलपैकी चारही नेते संबंधित होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) साम्यवादी चळवळ
2) ट्रेड युनियन चळवळ
3) शेतकरी चळवळ
4) संस्थानातील चळवळ

---

**Q.27)** महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये " पुणे करार " घडवून आणण्यासाठी खालीलपैकी कोणी प्रयत्न केले होते?

अ) डॉ. मुंजे
ब) मदन मोहन मालवीय
क) एम. सी. राजा
ड) सुभाषचंद्र बोस

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क
2) फक्त ब
3) अ, ब, ड
4) वरील सर्व

---

**Q.28)** काँग्रेसच्या प्रांतिक सरकारांनी सुरु केलेल्या ' मूलभूत शिक्षण ' पध्दतीचे स्वरुप काय होते?

**पर्यायी उत्तरे :**

1) स्वत: कमाविणे व शिकणे
2) श्रमा प्रधान
3) श्रम प्रधान व उत्पादन
4) खादीचा विकास व देशी शिक्षण प्रचार

---

**Q.29)** मुळशी सत्याग्रह विषयी खालील विधानांचा विचार करा?

**विधान** (A) : महात्मा गांधीच्या सूचनेनुसार शंकरराव देव, शिवराम पंत परांजपे, डॉ. फाटक, भोपटकर इत्यादींच्या नेतृत्वाखाली १९२१ ते १९२४ अशी तीन वर्ष सत्याग्रह केला गेला.

**विधान** (R) : टाटा कंपनीने जलविदयुत प्रकल्प उभारण्यासाठी इंग्रजांबरोबर केलेल्या करारामध्ये प्रकल्पात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांचा काहीही विचार केलेला नव्हता.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त विधान (A) बरोबर
2) फक्त विधान (R) बरोबर
3) दोन्ही विधाने बरोबर असून विधान (R) हे विधान (A) चे योग्य कारण नाही.
4) दोन्ही विधाने बरोबर असून विधान (R) हे विधान (A) चे योग्य कारण आहे.

---

**Q.30)** ' छोडो भारत ' चळवळीविषयी योग्य विधाने ओळखा?

अ) गांधीजींनी दांडीच्या किनाऱ्यावर मीठ उचलून चळवळीची सुरुवात केली गेली.

ब) या चळवळीच्या काळात अकोला जिल्हयात दहीहंडा गावामध्ये खाऱ्या पाण्याच्या विहिरींमध्ये मीठ तयार करुन कायदेभंग केला गेला.

क) क्रांतिसिंह नाना पाटील, राजू ताई कदमयांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हयातील बिळाशी येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला.

ड) संत तुकाडोजी महाराज यांनी हिंदी व मराठी पद्यरचना व खंजिरीच्या खडया आवाजातून जनजागृती घडून आणली.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क 2) फक्त अ 3) फक्त ड 4) एकही नाही.

---

**Q.31)** खालीलपैकी कोणती अभिनव भारत संघटनेची उद्दिष्टे होती?

अ) भारतीय सैनिकांमध्ये ब्रिटिशांच्या विरुध्द प्रचार करणे.

ब) स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या कार्यक्रमाव्दारे लोकमत तयार करणे.

क) शक्य असेल त्या ठिकाणी गनिमी काव्याने लढा चालविणे.

ड) परदेशामध्ये शस्त्र खरेदी करुन ती गुप्तपणे भारतात पाठविणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क 2) ब, ड फक्त 3) अ, क, ड 4) वरील सर्व

---

**Q.32)** वासुदेव बळवंत फडके यांच्या घराण्याकडे पेशवाई मध्ये खालीलपैकी कोणत्या किल्ल्याची किल्लेदारी होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) अर्नाळा 2) कर्णाळा 3) रायगड 4) सुधागड

---

**Q.33)** रयतवारी पध्दतीमुळे महाराष्ट्रात खालीलपैकी कोणती परिणाम घडून आले?

अ) पाटील, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांचे महत्त्व कमी झाले.

ब) शेतकरी-सावकार व शेतकरी - सरकार यांच्या संबंधात बदल घडून आला.

क) ग्रामीण रचनेतील एकसलगपणा कमी झाला.

ड) ब्रिटिश शासन व शेतकरी यामध्ये जमीनदारांचा मध्यस्थ वर्ग तयार झाला.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ड फक्त 2) फक्त अ, ब, क 3) वरील सर्व 4) फक्त ड

---

**Q.34)** " शुध्दीकरण चळवळ " खालीलपैकी कोणत्या संस्थेची संबंधित आहे?

**पर्यायी उत्तरे :**

1) सत्यशोधक समाज 2) आर्य समाज 3) ब्राह्मणेत्तर चळवळ 4) प्रार्थना समाज

**Q.35)** सामाजिक परिषदेविषयी अयोग्य विधान ओळखा?

**पर्यायी उत्तरे :**

1) राष्ट्रीय सभेच्या 1988 मधील अलाहाबाद अधिवेशनात ही संघटना स्थापन झाली.
2) देशातील लोकांचे लक्ष सामाजिक प्रश्नांकडे वेधून घेणे आणि समाज सुधारण्याच्या कार्याला गती देणे हा परिषदेचा मुख्य हेतू होता.
3) बालविवाह, विधवा स्त्रियांची स्थिती, केशवपण, अस्पृश्यता इत्यादी अनिष्ठ चालीरीतींवर चर्चा करुन उपाय सुचविण्यावर या परिषदेत भर दिला जात होता.
4) टिळकांच्या अनुयायांनी सामाजिक परिषदेचा मंडप जाळण्याची धमकी दिली होती.

---

**Q.36)** योग्य जोडया जुळवा?

अ) आदिवासी समाजोन्नती संघ — a) महादेव गोपाळ कडू
ब) आदिवासी विकास महामंडळ — b) पांडुरंग ढवळा साबळे
क) ओम आदिशक्ती आदिवासी सेवा संघ — c) बाबुराव नारायण मडावी
ड) आदिवासी सुधार सेवा समिती — d) डॉ. रामराव वाडीवे

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | a | c | b | d |
| 3) | d | c | b | a |
| 4) | a | c | d | b |

---

**Q.37)** खालीलपैकी.......यांनी “ क्रांतिकारी साम्यवादी पक्ष (रेवोल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी) 1942 मध्ये स्थापन केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) श्रीपाद अमृत डांगे
2) सौमेंन्द्रनाथ टागोर
3) रफिक अहमद
4) बी. टी. रणदिवे

---

**Q.38)** खालील विधानांशी संबंधित असणारा ब्रिटिश भारतातील कायदा ओळखा?

अ) मुंबई, बंगाल, वायव्य प्रांत व पंजाब प्रांतांमध्ये कायदे मंडळाची स्थापना
ब) व्हॉइसरायला आणीबाणीत कायदेमंडळाच्या परवानगीशिवाय अध्यादेश करण्याचा अधिकार
क) खातेवाटप पध्दतीची सुरुवात
ड) भारतीयांचा कायदेमंडळात प्रवेश

**पर्यायी उत्तरे :**

1) १८५३ चा चार्टर अ‍ॅक्ट
2) 1861 चा कौन्सिल
3) मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा
4) 1892 चा कौन्सिल ऍक्ट

**Q.39)** वेव्हेल योजना (1945) जाहीर करण्यात आली कारण........

**पर्यायी उत्तरे :**

1) भारताचे समर्थन मिळावे म्हणून जगातील विविध देशांकडून ब्रिटनवर दबाव येत होता.
2) ब्रिटनला लवकरात लवकर सत्तेची हस्तांतरण भारतीय नकडे करावयाचे होते.
3) गांधीजींच्या सविनय कायदेभंग आंदोलनामुळे ब्रिटिश भारतातील सत्ता भारतीयांकडे सोपविण्यात हतबल झाले होती.
4) युरोपातील युध्दासाठी चर्चेला भारतीयांची मदत हवी होती.

---

**Q.40)**

अ) त्याने काही काळ इंग्लंडच्या संसदेचे सदस्य पद भूषविले होते.

ब) मराठयांच्या राजकारणास त्याने विकृत, कारस्थानी व कपटी असे म्हटले होते.

क) सिडनी ओवेनच्याच्या मतानुसार " त्याने कंपनीचे भारतातील एक राज्य साम्राज्यात रुपांतरित केले. "

ड) त्याच्या कार्यकाळात पेशवा, शिंदे, भोसले, अवध, कर्नाटक यांनी तैनाती फौजेचा स्वीकार केला.

वरील विधानांची संबंधित असणारा ब्रिटिश अधिकारी ओळखा?

**पर्यायी उत्तरे :**

1) लॉर्ड मिंटो प्रथम
2) लॉर्ड वेलस्ली
3) लॉर्ड एकहर्स्ट
4) लॉर्ड डलहौसी

---

**Q.41)** खालीलपैकी कोणते वृत्तपत्र अरविंद घोष यांच्याशी संबंधित आहे ?

अ) वंदे मातरम ब) इंदूप्रकाश क) कर्मयोगी ड) धर्म इ) आर्य

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ड
2) सर्व
3) फक्त इ नाही
4) अ, क, ड, इ

---

**Q.42)** लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या गणपती उत्सवाबद्दल खालीलपैकी कोणत्या नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली होती?

अ) गो. ग. आगरकर ब) विष्णुशास्त्री चिपळूणकर

क) न्यायमूर्ती रानडे ड) बाळकृष्ण चाफेकर इ) गोपाळ कृष्ण गोखले

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, क, ड, इ
2) फक्त ब
3) अ, इ
4) एकही नाही.

---

**Q.43)** शिवराम हरी राजगुरु यांच्या विषयी काय खरे नाही?

**पर्यायी उत्तरे :**

1) त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील खेड येथे झाला.
2) " रघुनाथ " या टोपण नावाने ते ओळखले जात.
3) सोंडर्स वधामध्ये पहिल्या दोन गोळ्या त्यांनी झाडल्या होत्या.
4) " गदर " या क्रांतिकारी संघटनेत ते सहभागी होते.

**Q.44)** योग्य जोडया जुळवा ?

| | |
|---|---|
| अ) INTUC | a) 1948 |
| ब) आदिवासी विकास महामंडळ | b) 1929 |
| क) Trade dispute Act. | c) 1881 |
| ड) किमान वेतन कायदा | d) 1946 |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | d | b | c | a |
| 2) | a | b | c | d |
| 3) | d | c | b | a |
| 4) | c | b | a | d |

---

**Q.45)** योग्य विधान / विधाने ओळखा ?

अ) दक्षिण आफ्रिकेतील व्दितीय बोअर युध्दात रेडक्रॉस च्या वतीने ब्रिटिश सैनिकांसाठी कार्य केल्याने गांधीजींना " कैसर-ए-हिंद " ही पदवी देण्यात आली होती.

ब) धारासना येथील मीठ सत्याग्रहींवर ब्रिटिशांकडून होणारी दडपशाही व अत्याचार याचा निषेध म्हणून म. गांधींनी " कैसर-ए-हिंद " ही पदवी ब्रिटिशांना परत केली.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधान अ    2) विधान ब    3) अ व ब    4) अ नाही व ब नाही.

---

**Q.46)** खालील विधानांचा विचार करा ?

अ) जर्मनीतील स्टुटगार्ड येथील " International socialist Congress " मध्ये मॅडम भिकाजी कामा यांनी ध्वज फडकवला होता.

ब) सरोजिनी नायडू यांना ' भारताच्या कोकिळा ' म्हणून ओळखले जाते.

क) 1936 मधील राष्ट्रीय काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनात अवंतिकाबाई गोखले यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या गटाने सहभाग घेतला होता.

ड) विजयालक्ष्मी पंडित या मंत्रिपद भूषविणाऱ्या भारतातील पहिल्या महिला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ब योग्य    2) वरील सर्व योग्य
3) फक्त ड अयोग्य    4) अ, ब, ड योग्य

---

**Q.47)** " हेराका आंदोलन " खालीलपैकी कोणत्या गोष्टीची संबंधित आहे ?

**पर्यायी उत्तरे :**

1) केरळमधील मोपला शेतकऱ्यांनी उभारलेले आंदोलन
2) ईशान्य भारतातील नागा लोकांच्या ख्रिश्चन करणाविरोधात आंदोलन
3) दारी पासी यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांचे आंदोलन
4) दुसऱ्या महायुध्दकाळात कम्युनिस्टनचे रशियाला पाठिंबा देण्यासाठी आंदोलन

**Q.48)** अमरसिंह व प्रीतम सिंह हे खालीलपैकी कोणत्या संघटनेशी संबंधित होते?

**पर्यायी उत्तरे :**

1) Independence league
2) Free India centre
3) अकाली चळवळ
4) गदर

---

**Q.49)** खालीलपैकी कोणी महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळीची तुलना युरोपातील धर्म सुधारणा चळवळीशी केली होती?

**पर्यायी उत्तरे :**

1) महात्मा फुले
2) दिनकरराव जवळकर
3) लक्ष्मण शास्त्री जोशी
4) प्रबोधनकार ठाकरे.

---

**Q.50)** 1956 मधील राज्य पुनर्रचना आयोगाच्या अहवालामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबी समाविष्ट होत्या.

अ) भारतामध्ये भाषिक पुनर्रचनेच्या आधारावर १६ राज्य व ०३ केंद्रशासित प्रदेश निर्माण करावेत.

ब) बिहार व आसाम यामधून नविन ‘ आदिवासी राज्य ’ निर्माण करावी.

क) राष्ट्रीय ऐक्यासाठी अखिल भारतीय सेवांमध्ये निम्मे उमेदवार राज्याबाहेरील असावेत.

ड) उच्च न्यायालयातील १/३ न्यायाधीश राज्याबाहेरील असावे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क योग्य
2) फक्त क बरोबर
3) अ व ड अयोग्य
4) फक्त ब अयोग्य

---

**Q.51)** खालीलपैकी कोणती नेहरुंच्या अलिप्ततावादी धोरणाची वैशिष्टये सांगता येतील?

अ) आपल्या परराष्ट्र नीतीचे निर्धारण स्वत: करणे.

ब) वसाहतवाद व साम्राज्यवादाचा विरोध करणे.

क) पंचशील तत्वांची अंमलबजावणी करणे.

ड) आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या बाबतीत कोणत्याही प्रकरणात तटस्थ भूमिका बजावणे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ब फक्त
2) अ, ब, क फक्त
3) वरील सर्व
4) ब, क, ड फक्त

---

**Q.52)** “ एक देश, एक संस्कृती, एक राष्ट्र...!

या विचारावर आधारित संघटना खालीलपैकी.....ही आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
2) समाजवादी पक्ष
3) जनसंघ
4) द्रविड मुन्नेत्र कळघम

---

**Q.53)** 1975 मधील आणीबाणीच्या विरोधात सत्याग्रहांमध्ये.........यांनी सहभाग घेतला होता.

1) मणिबेन पटेल
2) दुर्गाबाई भागवत
3) जी. एस. शिवरुद्रप्पा

**पर्यायी उत्तरे :**

1) वरील सर्व
2) फक्त अ
3) अ व क
4) ब व क

**Q.55)** " सलवा जुडम " मोहिमेचे प्रणेते खालीलपैकी ..........होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) प्रफुल्ल कुमार महंतो
2) महेंद्र कर्मा
3) सोम्या जीव्या म्हसे
4) चारू मुजुमदार

---

**Q.56)** 1937 मधील प्रांतिक विविधमंडळाच्या निवडणुकीत आंबेडकरांचे निवडणूक चिन्ह.........हे होते?

**पर्यायी उत्तरे :**

1) माणूस
2) शिट्टी
3) उगवता सूर्य
4) यापैकी नाही.

---

**Q.57)** खालीलपैकी...........यांनी एप्रिल 1920 मध्ये नाशिक येथे उदोजी स्टुडंट्स होस्टेलची पायाभरणी केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) राजर्षी शाहू महाराज
2) साने गुरुजी
3) कर्मवीर भाऊराव पाटील
4) भाऊसाहेब हिरे

---

**Q.58)** अयोग्य विधान ओळखा.

**पर्यायी उत्तरे :**

1) पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी लाहोर येथे गांधर्व विद्यालयाची स्थापना केली.
2) १९२४ च्या काँग्रेसची काकीनाडा अधिवेशनात पलुस्कर यांनी वंदे मातरम हे गीत गायले होते.
3) विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी म संगीत दर्पणफ्फ हे संगीतावरील पहिले मासिक सुरु केले होते.
4) विष्णू दिगंबर पलूसकर हे बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य होते.

---

**Q.59)** १८५७ च्या उठावाशी संबंधित योग्य जोडया जुळवा.

| **ठिकाण** | **नेतृत्व** |
|---|---|
| अ) रोहिलखंड | a) खान बहादूर खान |
| ब) सातपुडा | b) शंकर शहा |
| क) कोल्हापूर | c) चिमाभाऊ साहेब |
| ड) आसाम | d) दिवाण मणिराम दत्त |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | d | b | a | c |
| 3) | c | b | a | d |
| 4) | a | b | d | c |

**Q.60)** योग्य जोडया जुळवा.

| **घटना** | **ब्रिटिश गव्हर्नर जनरल** |
|---|---|
| अ) प्रथम इंग्रज–म्हैसूर युध्द | a) कॉर्नवालीस |
| ब) व्दितीय इंग्रज–म्हैसूर | b) व्हेरलेस्ट |
| क) तृतीय इंग्रज–म्हैसूर युध्द | c) लॉर्ड वेलस्ली |
| ड) चतुर्थ–म्हैसूर युध्द | d) वारेन हेस्टिंग |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | d | c | b | a |
| 3) | b | d | a | c |
| 4) | d | b | a | c |

---

**Q.61)** नागरी सेवांमध्ये (Civil Services) भारतीयांचा हिस्सा किती असावा; यावर विचार करण्यासाठी 1912 ब्रिटीश शासनाने........आयोग स्थापन केला होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) फ्रेझर आयोग
2) इसलिंग्टन आयोग
3) एचिसन्स आयोग
4) व्हिटले आयोग

---

**Q.62)** राममोहन रॉय यांना..........यांनी राजा ही पदवी बहाल केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) देवंद्रनाथ टागोर
2) बहादुरशाह जफर
3) अकबर व्दितीय
4) लॉर्ड विल्यम बेंटिक

---

**Q.63)** 1857 पूर्वी महाराष्ट्रात झालेल्या भिल्लांच्या उठावाविषयी खालील विधानांचा विचार करा ?

**विधान** (A) : खानदेश व पश्चिम घाटात मुख्यत: हे बंड झाले.

**विधान** (R) : शेतीवर जाचक अटी लादल्याने हे बंड करण्यात आले.

**पर्यायी उत्तरे :**

1) विधान (A) बरोबर; विधान (R) चूक
2) दोन्ही विधाने बरोबर
3) दोन्ही विधाने बरोबर असून विधान (R) हे विधान (A) चे योग्य कारण आहे.
4) फक्त विधान (A) बरोबर

---

**Q.64)** भारतातील कामगार चळवळीचे खालीलपैकी कोणते वैशिष्टय सांगितले पाहिजे ?

अ) त्यांना राजकीय परिस्थितीशी संघर्ष करावा लागला.

ब) परकीय व भारतीय भांडवलदारांशी त्यांना संघर्ष करावा लागला.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ योग्य
2) फक्त ब योग्य
3) अ व ब दोन्ही अयोग्य
4) अ व ब दोन्ही योग्य

---

**Q.65)** खालीलपैकी..........यांनी इटलीचा क्रांतिकारक मॅझिनी व त्याने सुरु केलेल्या तरुण इटली चळवळींवर तसेच गॅरीबॉल्डी व कार्बोनेरी चळवळींवर भाषणे दिली.

अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी
ब) लाला लजपत राय
क) चंद्रशेखर आझाद
ड) सय्यद अहमद खान

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त क
2) अ व क
3) अ व ब
4) वरील सर्व

---

**Q.66)** जहालमतवादी विचारसरणीशी संबंधित असणारे विधान ओळखा?

अ) स्वातंत्र्य चळवळ बुध्दिवादी वर्गाप्रती मर्यादित न ठेवता जनसामान्यांपर्यंत पेहोचविणे.
ब) ब्रिटीश सत्ता उलटवून टाकणे.
क) भारतीय जनतेने जनआंदोलनात सहभागी करुन घेणे.
ड) ब्रिटिशांच्या विरुध्द नि:शस्त्र संघर्ष करुन मिळेल ते साध्य करुन घ्यावे; उर्वरित प्रश्नांसाठी पुन्हा संघर्ष करावा.

**पर्यायी उत्तरे :**

1) ब
2) फक्त ड
3) क
4) सर्व

---

**Q.67)** 1937 च्या निवडणुकांत राष्ट्रीय सभेला 08 प्रांतात सरकार स्थापन करण्यात यश आले; या आठही प्रांतातील राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळाची पहिली कृती म्हणजेच.......

**पर्यायी उत्तरे :**

1) मिठावरील कर रद्द करणे.
2) सर्व राजबंद्यांची मुक्तता
3) दारुबंदीचा ठराव पारित केला.
4) ब्रिटीश विरोधी राष्ट्रव्यापी जनआंदोलन घडवून आणणे.

---

**Q.68)**

अ) पेशावर मधील लाल डगले वाल्यांचा सत्याग्रह
ब) बाबू गेनूचे बलिदान
क) स्त्रिया, शेतकरी, आदिवासी, दलित यांचा सक्रिय सहभाग

वरील घटनांशी संबंधित असणारा पर्याय ओळखा.

**पर्यायी उत्तरे :**

1) स्वदेशी आंदोलन
2) असहकार आंदोलन
3) सविनय कायदेभंग आंदोलन
4) चले जाव चळवळ

**Q.69)** योग्य जोडया जुळवा.

अ) कामगार हितवर्धक सभा. a) नारायण मेधाजी लोखंडे
ब) सोशल सर्विस लीग. b) बी. पी. वाडिया
क) मद्रास सर्विस लीग. c) नारायण मल्हार जोशी
ड) बॉम्बे मिल हॅंड्स असोसिएशन d) सिताराम केशव बोले

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | d | c | b | a |
| 3) | a | c | b | d |
| 4) | b | c | a | d |

**Q.70)** खालील वाक्यांमध्ये कोणाचे वर्णन करण्यात आले आहे?

अ) आयुष्याच्या प्रारंभी " खाके वतन जर्रा मेरे लिये खुदा है " असे सांगून ते हिंदू मुस्लिम ऐक्याचे समर्थन करत.
ब) ते ' पॅन -इस्लामवादी ' होते.
क) भारत एक राष्ट्र नाही; भारतात मुस्लिमांचा एक वेगळा धार्मिक व सांस्कृतिक गय आहे असे त्यांचे मत होते.
ड) " भारतामध्ये मुस्लिम भारत असावा " ही त्यांची मागणी होती.
इ) ' काँग्रेस म्हणजे राजा महाराजांचा पक्ष आहे. ' असे ते म्हणत.

**पर्यायी उत्तरे :**

1) सय्यद अहमद खान 2) मोहमद्द इकबाल
3) खान अब्दुल गफार खान 4) नगरुल इस्लाम

**Q.71)** " हा सुधारणा कायदा म्हणजे जन्माला आलेले एक मृत अर्भक होते." असे आर.सी. मुजुमदार यांनी कोणत्या कायद्याबद्दल म्हटले आहे?

**पर्यायी उत्तरे :**

1) 1909 चा कायदा 2) 1853 चा कायदा
3) 1935 चा कायदा 4) 1919 चा कायदा

**Q.72)** 1937 च्या निवडणुका नंतर पंजाब मध्ये......यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) लाला लजपत राय 2) पटीयालाचे महाराज रणजीत सिंह
3) सिकंदर हयात खान 4) लियाकत अली खान

**Q.73)** आझाद हिंद सेनेच्या ' झाशी राणी रेजिमेंटमध्ये ' खालीलपैकी कोणत्या महिलांचा समावेश होता?

अ) सौम्या बॅनर्जी  ब) जानकी थेवी  क) बेला दत्ता  ड) डॉ.लक्ष्मी स्वामीनाथन

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ आणि ड  2) फक्त ब आणि क
3) फक्त ब, क आणि ड  4) वरील सर्व

---

**Q.74)** 1921 मधील " मोपला बंडाची " खालीलपैकी कोणती कारणे होती?

अ) मोपल्यांवरील जमीनदारांचे अत्याचार
ब) इंग्रजांचे खिलाफतविरोधी धोरण.
क) हिंदूंची सक्तीने होणारी धर्मांतरे

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त क  2) अ आणि ब  3) अ आणि क  4) वरील सर्व

---

**Q.75)** योग्य जोडया जुळवा?

(१८५७ च्या उठावातील ब्रिटिश अधिकारी व त्यांच्याशी संबंधित घटना)

| | |
|---|---|
| अ) हडसन | a) बहादूरशहा याला शरण आला. |
| ब) हॅलवॅक | b) नानासाहेबांचा पराभव केला. |
| क) कॉलिंग कॅम्पबेल | c) तात्या टोपेंचा पराभव केला. |
| ड) हेन्री लॉरेन्स | d) युध्दात मरण पावला. |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | d | c | b | a |
| 3) | c | d | b | a |
| 4) | a | b | d | c |

---

**Q.76)** खालील विधानांचा विचार करा?

अ) डिसेंबर १८८५ रोजी भारतातील वेगवेगळया प्रांतातील ७५ राजकीय कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली.
ब) लॉर्ड डफरीन यांच्या मार्गदर्शनाखाली ए. ओ. ह्युम यांनी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली.
क) राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेमध्ये हेन्री कॉटन व विल्यम बेडरबर्ग या इंग्रजांचा समावेश होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) अ योग्य  2) अ क ड योग्य  3) ब क ड योग्य  4) वरील सर्व योग्य

**Q.77)** योग्य विधान/विधाने ओळखा ?

अ) १८२२ मध्ये राजा राम मोहन रॉय यांनी हाय इंग्लिश स्कूल (एग्लो–हिंदू स्कूल) शाळा काढली.

ब) याच शाळेमध्ये देवेंद्रनाथ टागोर यांचे शिक्षण झाले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ 2) फक्त ब 3) एकही नाही. 4) वरील सर्व

---

**Q.78)** खालील विधाने पहा ?

अ) सप्टेंबर १९२३ मध्ये दिल्ली येथे राष्ट्रीय काँग्रेसजे विशेष अधिवेशन भरविले गेले.

ब) फेरवादी (Changers) व नाफेरवादी ( No-changers) यामध्ये ऐक्य घडवून आणणे हा या अधिवेशनाचा उद्देश होता.

क) या अधिवेशाचे अध्यक्ष राष्ट्रीय सभेचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले.

**पर्यायी उत्तरे :**

1) सर्व बरोबर 2) फक्त क बरोबर 3) अ व ड बरोबर 4) एकही बरोबर नाही.

---

**Q.79)** " Public Safety Bill " हे भारतीयांच्या गुलामीचे पहिले विधेयक आहे असे वर्णन खालीलपैकी ..... यांनी केले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) जवाहरलाल नेहरु 2) भगतसिंग
3) विठ्ठल भाई पटेल 4) मोतीलाल नेहरु

---

**Q.80)** " गदर " संघटनेचा मुख्य उद्देश म्हणजे..................

**पर्यायी उत्तरे :**

1) ब्रिटिश सत्ता संपुष्टात आणून भारतात प्रजासत्ताक संघराज्य स्थापन करणे.
2) भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढाऊ सैनिक तयार करणे.
3) जुलमी ब्रिटीश अधिकाऱ्यांची हत्या करणे.
4) दुसऱ्या महायुध्दात गुंतलेल्या ब्रिटिशाच्या असाहाय्यतेचा फायदा घेऊन भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ तीव्र करणे.

---

**Q.81)** खालील विधानांशी संबंधित असणारी व्यक्ती ओळखा?

अ) ते भारतातील एक निष्णात वकील होते.

ब) त्यांनी म वंदे मातरमफ या दैनिकातून लेखन केले.

क) त्यांनी People नावाचे इंग्रजी मासिक सुरु केले.

ड) यंग इंडिया, महान अशोक, छत्रपती शिवाजी अशी पुस्तके त्यांनी लिहिली.

**पर्यायी उत्तरे :**

1) रवींद्रनाथ टागोर 2) स्वातंत्र्यवीर सावरकर
3) लाला लजपत राय 4) बिपिनचंद्र पाल

**Q.82)** खालील विधानांचा विचार करा.

अ) राष्ट्रीय सभेच्या १९३१ मधील कराची अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मूलभूत हक्कांचा ठराव मांडला.

ब) राष्ट्रीय सभेच्या १९२० च्या नागपूर अधिवेशनात चित्तरंजन दास यांनी असहकार चळवळ सुरु करण्याचा ठराव मांडला.

क) डिसेंबर १९०६ (ढाक्का) येथे नवाब सलीम उल्ला यांनी मुस्लिम लीग ही राजकीय पार्टी स्थापन करण्याचा ठराव मांडला.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ व क बरोबर, ब चूक
2) ब व ड बरोबर, क चूक
3) फक्त क चूक
4) वरील सर्व बरोबर

---

**Q.83)**

अ) १८७० मध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी ‘ कामगार मंडळ ’ स्थापन केले होते.

ब) या कामगार मंडळामार्फत “ भारत श्रमजीवी ” हे मासिक प्रकाशित केले जाई.

क) कामागर वर्गामध्ये शिक्षण प्रसार करणे ह वरील मासिकाचा हेतू होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त क बरोबर
2) अ व ब बरोबर
3) फक्त ड चूक
4) फक्त अ चूक

---

**Q.84)** भारतातील कामगार चळवळीच्या वाढीसाठी खालीलपैकी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या?

अ) महात्मा फुले यांचे कार्य

ब) league of Nation व International labour Organisation ची स्थापना.

क) दुसरे महायुध्द

ड) साम्यवादी गटाचे नेतृत्व

**पर्यायी उत्तरे :**

1) अ व ब
2) ब, क, ड
3) फक्त ड
4) अ, ब, ड

---

**Q.85)** अनंत कान्हेरे यांनी नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन यांच्या हत्या केली कारण.......

**पर्यायी उत्तरे :**

1) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना लंडनमध्ये अटक झाली.
2) मदनलाल धिंगरा याने कर्झन वायीची हत्या केली व त्यापासून तो प्रेरित झाला.
3) टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरुन त्यांना मंडाले येथे पाठवण्यात आले.
4) बाबराव सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

---

**Q.86)** भारतातील राष्ट्रीय चळवळीशी सबंधित कोणत्या वृत्तपत्राने ‘ रेल्वे व वाहतुकीच्या साधनांचे तसेच पोलाद व जहाज बांधणी उद्योगांचे राष्ट्रीयकरण करावे ’ असा विचार मांडला होता?

**पर्यायी उत्तरे :**

1) Maratha
2) Revolutionary
3) Bombay Herald
4) बहिष्कृत

**Q.87)** खालील विधानांशी संबंधित योग्य असणारी व्यक्ती ओळखा?

अ) मित्रांच्या सहकार्याने ' अस्पृश्य लोकांस विद्या शिकविणारी मंडळ ' त्यांनी स्थापन केले.

ब) अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी संपूर्ण समाज रचनेची पुनर्रचना करणे गरजेचे आहे; हा विचार त्यांनी सर्वप्रथम मांडला.

क) कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पुण्यातून ' दिनबंधू ' वृत्तपत्र सुरु केली.

ड) त्यांनी नगरपालिकेचे नगरसेवक पद भूषविले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) गोपाळबाबा वलंगकर
2) महात्मा फुले
3) सार्वजनिक काका
4) जगन्नाथ (नाना) शंकर शेठ

---

**Q.88)** " महाराष्ट्राची सरोजिनी आता तयार झाली आहे. " असे वक्तव्य नाशिक येथे असहकार चळवळीच्या काळात लोकमान्य टिळकांनी केले होते.

वरील वक्तव्याशी संबंधित असणारी व्यक्ती कोण?

**पर्यायी उत्तरे :**

1) अवंतिकाबाई गोखले
2) डॉ. एनी बेझंट
3) कमलादेवी चटोपाध्याय
4) लक्ष्मीबाई टिळक

---

**Q.89)** खालीलपैकी योग्य विधान / विधाने ओळखा?

अ) महाराष्ट्रातील रंगभूमीला इ.स. १८४२ मध्ये सांगली येथून प्रारंभ झाला.

ब) विष्णुदास भावे यांना ' मराठी नाटयसृष्टीचे जनक ' असे म्हटले जाते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ बरोबर
2) फक्त ब बरोबर
3) अ व ब दोन्ही चूक
4) दोन्ही चूक

---

**Q.90)** खालील घटनांचा योग्य कालानुक्रम असणारा पर्याय ओळखा ?

अ) काकोरी येथे रेल्वेवर दरोडा

ब) सॉन्डर्स ची हत्या

क) हिंदुस्तान रिपब्लिक असोसिएशनची स्थापना

ड) Public safety Bill व Trade Dispute Bill यांची केंद्रीय विधिमंडळात मांडणी.

**पर्यायी उत्तरे :**

1) क, अ, ब, ड
2) अ, ब, क, ड
3) क, अ, ड, ब
4) ड, अ, क, ब

---

**Q.91)** महाराष्ट्रातील...........या विचारवंतांनी सर्वप्रथम स्वदेशीचा पुरस्कार केला.

**पर्यायी उत्तरे :**

1) लोकमान्य टिळक
2) न्या. रानडे
3) गोपाळ हरी देशमुख
4) गोपाळ कृष्ण गोखले

**Q.92)** खालीलपैकी......यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये योगदान दिले.

अ) पुरुषोत्तम सपळगावकर
ब) गोविंद भाई श्राफ.
क) बाबासाहेब परांजपे
ड) अनंत भालेराव
इ) स. कृ. वैशंपायन
ई) रामलिंग स्वामी

**पर्यायी उत्तरे :**

1) सर्व  2) फक्त ब  3) अ, ब, इ  4) इ व ई

---

**Q.93)** खालील विधानांचा विचार करा.

अ) महात्मा फुले यांनी १८६३ मध्ये पुण्यात " बालहत्या प्रतिबंधक गृह " स्थापन केले.

ब) अविवाहित स्त्रिया विधवा यांच्यासाठी तसेच भ्रूणहत्या व बालहत्या होऊ नये म्हणून काम करणारी भारतातील ही पहिली संस्था होती.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ बरोबर  2) अ व ब बरोबर  3) दोन्ही बरोबर  4) दोन्ही चूक

---

**Q.94)** " ऋषीमुनींमुळे भारत प्राचीन काळी जगाच्या गुरुस्थानी होताच व पुढील जगद्गुरु ही भारतात जन्मणार आहे " असे कोणत्या संस्थेमार्फत सांगितले जात असे.

**पर्यायी उत्तरे :**

1) सत्यशोधक समाज
2) आर्य समाज
3) थिऑसॉफिकल सोसायटी
4) प्रार्थना समाज

---

**Q.95)** स्वातंत्र्योत्तर भारतातील खालील चळवळींचा योग्य काला कालानुक्रम असणार पर्याय ओळखा ?

अ) तेलंगणा मधील शेतकरी आंदोलन

ब) " सिंहासन खाली करो...! " (संपूर्ण क्रांती) आंदोलन

क) जन लोकपाल चळवळ

ड) पहिली राष्ट्रीय चळवळ

**पर्यायी उत्तरे :**

1) अ, ब, क, ड
2) अ, ड, ब, क
3) ड, ब, क, अ
4) ब, अ, ड, क

---

**Q.96)** खालीलपैकी......यांचा असहकार चळवळीस विरोध होता.

**पर्यायी उत्तरे :**

1) पंडित मदन मोहन मालवीय
2) मोहम्मद अली जिना
3) डॉ. बा. शि. मुंजे
4) सर्व

---

**Q.97)** राष्ट्रीय सभेचे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन या ठिकाणी पार पडले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) लखनऊ  2) कलकत्ता  3) फैजापूर  4) हरीपूरा

**Q.98)** योग्य जोडया जुळवा ?

| | |
|---|---|
| अ) दुहेरी राज्यव्यवस्था | a) रॉबर्टसन समिती |
| ब) पहिला व्हाइसरॉय | b) चार्ल्स एचिसन |
| क) लोकसेवा आयोग | c) लॉर्ड कॅनिंग |
| ड) रेल्वे बोर्ड | d) रॉबर्ट क्लाईव्ह |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | d | c | b | a |
| 2) | d | b | a | c |
| 3) | c | d | b | a |
| 4) | a | b | c | d |

**Q.99)** '' चिकाटी धरा, एकी राखा, स्वराज्य मिळवा, चळवळ करा.... अखंड चळवळ करा.....! ङ्ग असा संदेश राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरुन कोणी दिला ?

**पर्यायी उत्तरे :**

1) आनंद मोहन बोस
2) गोपाळ कृष्ण गोखले
4) महात्मा गांधी
4) दादाभाई नौरोजी